# महाराष्ट्र विधानसभा

## पहिले अधिवेशन, २०१७

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

### अमरावती जिल्ह्यातील सावनेर-खिरसाना-निरसाना या मंजूर रस्त्याचे अपूर्ण राहिलेले काम त्वरीत पूर्ण करण्याबाबत

**(१) ९३०४ (०८-०४-२०१५). प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्ह्यातील सावनेर-खिरसाना-निरसाना या मंजूर रस्त्याचे अपूर्ण राहिलेले काम त्वरीत पूर्ण करण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी कार्यकारी अभियंता, जि.प.बांधकाम विभाग, अमरावती यांना दिनांक १५ डिसेंबर, २०१४ रोजी वा त्या सुमारास लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू रस्त्यांचे काम पूर्ण करण्यासाठी सदर निवेदनावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२२-१२-२०१६) :**(१) होय.

(२) लोणी मोरगाव-जनुना-टिमटाळा-सावनेर हा प्रजिमा क्र.७८ दर्जाचा रस्ता असून जि.प.बांधकाम विभागाकडून सार्वजनिक बांधकाम विभागाकडे हस्तांतरित झालेला आहे.

प्रश्नांकित रस्त्याच्या कि.मी. १४/०० ते १७/०० या लांबीतील काम जि.प. मार्फत मार्च २०१६ मध्ये पूर्ण झालेले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### रेणापुर (जि.लातूर) येथील शासकीय विश्रामगृहाची दुरुस्ती करण्याबाबत

**(२) २१०३८ (३०-०७-२०१५). श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रेणापुर (जि.लातूर) येथील शासकीय विश्रामगृहाची दुरुस्ती करण्याबाबत व शासकीय कर्मचाऱ्यांची सदर विश्रामगृहासाठी नियुक्ती करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे मे, २०१५ च्या सुमारास कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग लातूर यांचेकडे निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर विश्रामगृहाच्या दुरुस्तीबाबत व कर्मचारी नेमणुकीबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०४-०१-२०१७)** :(१) हे खरे आहे.
(२) विश्रामगृह दुरुस्तीचे काम मे अखेर पूर्ण झाले आहे. सद्य:स्थितीत विश्रामगृह सुस्थितीत असून वापरात आहे. तसेच महत्वाच्या व्यक्तींची गैरसोय होवू नये म्हणून उपलब्ध कर्मचाऱ्यांकडून तात्पुरत्या स्वरुपात काम करुन घेण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**एकात्मिक रस्ते प्रकल्पाचे नोबल इंटरेस्ट कन्सल्टन्सी इंजिनिअर्स या कंपनीने केलेल मोजमाप**

**(३) २२००४ (११-०८-२०१५). श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर), श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी), डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोल्हापूर शहरातील एकात्मिक रस्ते प्रकल्पाचे नोबल इंटरेस्ट कन्सल्टन्सी इंजिनिअर्स या कंपनीने केलेल्या मोजमापात महानगरपालिकेने केलेल्या पुन:पडताळणीत काही त्रुटी आढळल्या आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्याकरिता नोबल ने आणखी चार पथके नेमून पुन्हा नव्याने कामकाजास सुरुवात केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर नव्या पथकाला मोजमापाचे काम पूर्ण करुन २० मे पर्यंत संपुर्ण अहवाल सादर करण्याच्या सुचना दिल्या आहेत, सदर पथकाने आपला अहवाल शासनास सादर केला आहे काय,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०९-११-२०१६)** :(१) होय.
(२) पुर्नमुल्यांकन समितीने निर्देशित केलेल्या त्रुटी दुरुस्त करुन कंपनीने सुधारीत अहवाल कोल्हापूर महानगर पालिका व असोशिएशन ऑफ आर्किटेक्ट इंजिनिअर्स, कोल्हापूर यांचेमार्फत पुर्नमुल्यांकन समितीला सादर केला आहे.
(३) पुर्नमुल्यांकन समितीने आपला अहवाल शासनास सादर केला आहे. शासनाने दि.१.०१.२०१६ पासून कोल्हापूर एकात्मिक रस्ते विकास प्रकल्पावरील पथकर नाके बंद करण्याचा निर्णय घेतला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**संगणकीकृत ७/१२ मिळण्यात येत असलेल्या अडचणींबाबत**

**(४) २८३५५ (२३-१२-२०१५). श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मार्च २०१५ पासून संगणकीय ७/१२ देण्याचे आदेश शासनाने काढले आहेत. परंतु, सर्वच तलाठी कार्यालयांमध्ये वीज, दूरध्वनी जोडणी, इंटरनेट, प्रिंटर या सुविधा देण्यात आलेल्या नसल्यामुळे संगणक प्रशिक्षणानंतर तलाठी प्रशिक्षित झाले आहेत वा कसे याची खातरजमा करण्यात न आल्याने ग्रामीण भागातील शेतकर्यांना ७/१२ उत्तारे मिळवण्यात अडचणी येत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त परिस्थितीचा विचार करून शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२७-१२-२०१६) :**(१), (२), (३) ई-फेरफार तथा ऑनर्लान म्युटेशन कार्यक्रम सुरु करण्याचा निर्णय राज्य शासनाने दि.२३.०१.२०१३ घेतला आहे.

ई-फेरफार कार्यक्रमांतर्गत संगणकीकृत गा.न.नं. ७/१२ चा डाटा तयार करणे, तो डाटा स्टेट डाटा सेंटर (SDC) वर अपलोड करणे, ई-फेरफार आज्ञावलीच्या माध्यमातून फेरफार नोंदी घेणे तसेच संगणकीकृत गा.न.नं. ७/१२ वितरीत करणे या प्रक्रियेत काही ठिकाणी डाटा एन्ट्री, सर्व्हर, कनेक्टीव्हीटी व आज्ञावली विषयक समस्या उदभवल्याने त्यांच्या निराकरणार्थ यथोचित उपाययोजना करण्यात आल्या आहेत. राष्ट्रीय सूचना विज्ञान केंद्राकडून ई-फेरफार आज्ञावली व्हर्जन २ विकसित करुन ती वापरास उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. तसेच यासंदर्भातील अडीअडचणींचे निराकरण करण्यासाठी उपविभागीय तसेच जिल्हास्तरावर समित्या स्थापन करण्यात आल्या आहेत.

संगणकीकृत गा.न.नं. ७/१२ मधील डाटा एन्ट्री व डाटा कन्व्हर्जनच्या आढळणाऱ्या चुका दुरुस्त करुन त्यातील नोंदी हस्तलिखित गा.न.नं. ७/१२ शी जुळविण्याकरीता एडीट मोड्युल (Edit Module) उपलब्ध करुन देण्यात आले आहे. हस्तलिखित अभिलेखांप्रमाणे गा.न.नं. ७/१२ चे संगणकीकृत उतारे जेथे वितरीत करणे शक्य नाही तेथे खरीप हंगामासाठी शेतकरी खातेदारांना केवळ कर्ज व अन्य शेतीविषयक प्रयोजनासाठी दि.३१ जुलै, २०१६ पर्यंत हस्तलिखित गा.न.नं. ७/१२ उतारे देण्याची मुभा प्रदान करण्यात आली होती. यास मुदतवाढ देण्याच्या आवश्यकतेचा आढावा घेण्यात येत आहे.

तसेच "ई-फेरफार" कार्यक्रमासाठी शासनाने स्टेट डाटा सेंटर येथे अधिकच ५०TB स्टोरेज उपलब्ध करुन दिले असून या कार्यक्रमाकरीता जादा सर्व्हर्सही उपलब्ध करुन देण्यात आले आहेत. जेथे कनेक्टीव्हीटी विषयक समस्या आहेत. अशा प्रत्येक मंडळ स्तरावर तलाठी/ मंडळ अधिकाऱ्यांसाठी हायस्पीड कनेक्टीव्हीटीसह कार्यकक्ष (Work Station) स्थापन करण्याच्या सूचनाही सर्व जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आल्या आहेत. त्यानुसार राज्यात एकूण १४६५ कार्यकक्षांची स्थापना स्थापना करण्यात आली आहे. यापरिणामी ई-फेरफार आज्ञावलीच्या अंमलबजावणीतील बहुतांश अडचणींचे निराकरण झाले आहे.

---

**मुंबई-पूणे एक्सप्रेसवरील वाढत्या अपघातांची कारणे शोधण्यासाठी नेमलेल्या जे.पी.रिसर्च इंडीया प्रा.लि.या कंपनीने सादर केलेल्या अहवालाबाबत**

**(५) ३३००२ (२१-०१-२०१६). ॲड.भीमराव धोंडे (आष्टी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शासनाने मुंबई-पुणे एक्सप्रेसवरील वाढत्या अपघातांची कारणे शोधण्यासाठी नेमलेल्या जे.पी.रिसर्च इंडीया प्रा.लि.या संशोधन करणाऱ्या वाहतुक क्षेत्रातील प्रख्यात कंपनीने सन २०१२ ते २०१४ या कालावधीत सदर महामार्गावर घडलेल्या ३७२ अपघातांचे विश्लेषण करुन शासनास अहवाल सादर केला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर अहवालाचे थोडक्यात स्वरुप काय आहे,
(३) असल्यास, सदरहू अहवालामधील शिफारशींची तातडीने अंमलबजावणी करण्याबाबत शासनाकडून आजतागायत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहेत,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०९-११-२०१६) :**(१) होय.
(२) जे.पी.रिसर्च इंडीया प्रा.लि. यांनी दि.२२.०६.२०१५ रोजी मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावर रस्ता सुरक्षाबाबत अहवाल सादर केला आहे. त्यामध्ये अपघाताला कारणीभूत ठरणाऱ्या १५ प्रमुख बाबी नमुद करण्यात आल्या आहेत व त्यावर करावयाची उपाययोजना प्रस्तावीत केली आहे.
(३) मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावर अपघात होऊ नये म्हणून सुचना फलक, वळण फलक, दिशा दर्शक फलक, पांढऱ्या रंगाचे पट्टे, डेलीनेटर, कॅटाईज धोकादायक ठिकाणी पाण्याचे बॅरल्स उभारणे इ. उपाययोजना करण्यात आली आहे. विशेष उपाययोजना म्हणून २०१२ ते २०१४ या वर्षात अपघात प्रवण लांबीत आधुनिक स्टील वायर रोप क्रॅश बेरियर बसविण्यात आले आहे. तर २५ किमी लांबीत आधुनिक स्टील वायर रोप बसविण्याचे काम हाती घेण्यात आले आहे. जे.पी.रिसर्च प्रा.लि. यांनी सुचविलेल्या उपाययोजनांवर कार्यवाही करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**जासई गव्हाण (ता.उरण, जि.रायगड) हा रस्ता मजबूतीकरण व रुंदीकरण करण्याबाबत**

**(६) ४०३५७ (१६-०५-२०१६). श्री.मनोहर भोईर (उरण) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जासई गव्हाण (ता.उरण, जि.रायगड) हा रस्ता मजबूतीकरण व रुंदीकरण करणेबाबत मा. व्यवस्थापकीय संचालक, सिडको, मुंबई यांना स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक १७ जून, २०१५ रोजीच्या सुमारास निवेदन देऊनही अद्याप या संदर्भात कोणतीच कार्यवाही केली नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या संदर्भात शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२७-१२-२०१६) :**(१) व (२) प्रश्नाधीन रस्त्याचे मजबूतीकरण, रुंदीकरण करण्याबाबतचे दि.१७/६/२०१५ चे निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधींनी सिडको, मुंबई यांना दिलेले आहे. तसेच सदर काम करण्यासाठी प्रश्नांकित रस्ता सिडकोकडे वर्ग करण्याबाबतचे निवेदन कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अलिबाग, रायगड यांना दिलेले आहे. त्यानुसार रस्ता हस्तांतरणाबाबतचे अभिप्राय सिडकोकडून मागविण्यात आले आहेत. अभिप्राय अद्याप प्राप्त झालेले नाहीत.

सद्यस्थितीत सार्वजनिक बांधकाम विभागांमार्फत रस्त्यावरील खड्डे भरुन रस्ता वाहतुकीस सुस्थितीत ठेवण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कल्याण तालुक्यात (जि.ठाणे) ग्रामीण शासकीय विश्रामगृह उभारण्याबाबत**

**(७) ४११८९ (२९-०४-२०१६). श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण तालुक्यात (जि.ठाणे) ग्रामीण शासकीय विश्रामगृह उभारण्याची मागणी स्थानिक लोकप्रतीनिधिनी दिनांक १० डिसेंबर, २०१४ रोजी वा त्या सुमारास पत्रान्वये मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री यांच्याकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कल्याण तालुक्यामध्ये शासकीय विश्रामगृह बांधण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०४-०१-२०१७) :**(१) दिनांक १० डिसेंबर, २०१४ रोजी वा त्या सुमारास स्थानिक लोकप्रतिनिधींनी कल्याण तालुक्यात (जि.ठाणे) येथे ग्रामिण शासकीय विश्रामगृह उभारण्याची मागणी केली नाही. तथापि, मा.श्री.नरेंद्र पवार, वि.स.स. कल्याण (पश्चिम) यांनी दि.०२/०२/२०१६ रोजीच्या पत्रान्वये कल्याण येथील विश्रामगृहाच्या बांधकाम व दुरुस्तीसाठी तरतूद करण्याबाबत निवेदन केले आहे.

(२) कल्याण तालुक्यातील शासकीय विश्रामगृहाचा विस्तार करण्याच्या दृष्टीने आराखडा व अंदाजपत्रक तयार करण्याचे काम प्रगतीपथावर आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**शहापूर तालुक्यातील रस्त्याची कामे निकृष्ट दर्जाची झाली असल्याबाबत**

**(८) ४१८४४ (२९-०४-२०१६). श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्हयातील शहापुर तालुक्यातील सार्वजनिक बांधकाम उपविभागाचे उपअभियंता व ठेकेदार यांच्यातील संगनमत व आर्थिक गैरव्यवहारामुळे शहापुर तालुक्यातील रस्त्याची कामे निकृष्ट दर्जाची झाली असल्याप्रकरणी दक्षता व गुणनियंत्रण मंडळ, नवी मुंबई यांचेकडून सुरु असलेली चौकशी पूर्ण झालेली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रश्न भाग (१) मधील प्रकरणी केलेल्या चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) असल्यास, उक्त प्रश्नी अद्याप कोणतीही कार्यवाही केलेली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत, तसेच सदर प्रकरणी संबंधितांवर त्वरित कारवाई करण्यासंदर्भात आतापर्यंत कोणता पाठपुरावा केला वा करण्यात येत आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२७-१२-२०१६) :**(१), (२) व (३) प्रश्नाधीन कामाची अधीक्षक अभियंता, दक्षता व गुण नियंत्रण मंडळ, नवी मुंबई यांच्याकडे चौकशी प्रगतीत आहे.

---

### पुणे-बेंगलोर राष्ट्रीय महामार्ग क्र.४ चे सहापदरीकरण करावयाच्या कामांतर्गत बाधीत होत असलेल्या नळ पाणीपुरवठा योजना व त्यांची उपांगे स्थलांतरीत करण्याच्या अंमलबजावणीबाबत

**(९) ४२४८२ (२९-०४-२०१६). श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे-बेंगलोर राष्ट्रीय महामार्ग क्र.४ चे सहापदरीकरण करावयाच्या कामांतर्गत बाधीत होत असलेल्या नळ पाणी पुरवठा योजना व त्यांची उपांगे स्थालांतरीत करण्याच्या कामांच्या अंमलबजावणीबाबत दिनांक ०४ जुलै, २०१४ व दिनांक ०१ जानेवारी, २०१५ रोजी मा.प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण, वारजे पुणे यांना निवेदन दिले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबतीत शासनाने कोणती तातडीची कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०३-०१-२०१७) :**(१) होय.
(२) कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद, पुणे यांचेकडून ९ गावांच्या हद्दीतील नळ पाणी पुरवठा योजना व त्यांची उपांगे स्थलांतरीत करण्याच्या रु.८२.१२ लक्ष अंदाजित किंमतीच्या कामांना भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाने तत्वत: मंजुरी दिली असून सदरील कामे प्रगतीपथावर आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबईतील सेट टॉप बॉक्स नसणाऱ्या ९ लाख टिव्हीचे सिग्नल बंद करण्याचा शासनाने घेतलेला निर्णय**

**(१०) ४२६०८ (२०-०४-२०१६). श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.शिरीषदादा चौधरी (अमळनेर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील सेट टॉप बॉक्स नसणाऱ्या ९ लाख टिव्हीचे सिग्नल बंद करण्याचा शासनाने निर्णय घेतला असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निर्णयाची अंमलबजावणी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०९-११-२०१६) :**(१) व (२) केंद्र शासनाच्या माहिती व प्रसारण मंत्रालयाच्या दि.११ नोव्हेंबर, २०११ व दि.२१ जून, २०१२ च्या अधिसूचनेनुसार निर्धारित करण्यात आलेल्या केबल डिजीटायझेशन फेज-१ (PHASE-I) या कार्यक्रमांतर्गत बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या क्षेत्रामध्ये दि.३१/१०/२०१२ च्या मध्यरात्री पासून केबल टेली व्हिजनचे कार्यक्रम फक्त डिजीटल अॅड्रेसेबल पध्दतीनुसार प्रक्षेपित किंवा पुन:प्रक्षेपित करणे प्रत्येक केबल चालकांवर बंधनकारक करण्यात आलेले आहे. त्यानुसार दि.३१.१०.२०१२ च्या मध्यरात्रीपासून बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रामध्ये केबल टि. व्ही. जोडण्यांकरिता सेट टॉप बॉक्स अनिवार्य करण्यात आलेले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबईतील गोरेगांव पूर्व, आरे कॉलनी व दिंडोशीला जोडणाऱ्या उड्डाणपुलाचे शहिद वीर विजय साळसकर उड्डाणपुल असे नामकरण करणेबाबत**

**(११) ४४१९४ (२९-०४-२०१६). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील गोरेगांव पूर्व, आरे कॉलनी व दिंडोशीला जोडणाऱ्या उड्डाणपुलास शहिद वीर विजय साळसकर उड्डाणपुल असे नामकरण करणेबाबत मुंबई महापालिकेने राज्य शासनास पाठविलेल्या प्रस्तावास मान्यता द्यावी याकरिता लोकप्रतिनिधींनी मा.मंत्री तसेच अपर मुख्य सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग यांना दिनांक २२ सप्टेंबर, २०१५ रोजी लेखी निवेदन दिले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गत ७ वर्षापासून प्रलंबित असलेल्या नामकरणाच्या प्रस्तावास लागत असलेल्या विलंबाची कारणे काय आहेत,

(३) तसेच, सदरहू प्रस्तावास तातडीने मंजूरी देण्याबाबत शासनातर्फे कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे ?

**श्री. एकनाथ शिंदे (०९-११-२०१६)** :(१) हे खरे आहे.
(२) व (३) सार्वजनिक बांधकाम विभागाच्या शासन निर्णय क्रमांक-आरओडी-१०९९/२९२/९९/रस्ते-४, दि.१५.२.२००० अन्वये, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारितील रस्ते व पुलांना भविष्यात कोणत्याही मान्यवरांचे नाव न देण्याचा निर्णय घेतलेला आहे. अपवादात्मक बाब म्हणून प्रस्ताव मा.मुख्यमंत्री महोदयांच्या निर्देशानुसार मंत्रीमंडळापुढे सादर करण्याची कार्यवाही सुरु आहे.

---

**मुंबई शहर व उपनगरात माहे एप्रिल ते डिसेंबर २०१५ या कालावधीत डिटीएच आणि केबल टि.व्ही. ग्राहकांकडून ३० कोटी रुपयांहून अधिक करमणूक कर वसूल केल्याबाबत**

**(१२) ४४२४१ (२०-०४-२०१६). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई शहर व उपनगरात माहे एप्रिल ते डिसेंबर, २०१५ या कालावधीत डिटीएच आणि केबल टि.व्ही. ग्राहकांकडून ३० कोटी रुपयांहून अधिक करमणूक कर वसूल केला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने ग्राहकांकडून वसूल केलेल्या करमणूक कराची सद्य:स्थिती काय आहे,
(३) असल्यास, मुंबई शहर व उपनगरात एकूण डिटीएच आणि केबल टिव्ही ग्राहकाची संख्या किती आहे व त्यातून शासनाला दरवर्षाला किती करमणूक कर मिळत आहे,
(४) असल्यास, मुंबईची अधिकृत १ कोटी ३० लाख लोकसंख्या विचारात घेता केबल धारकानी कर बुडविण्यासाठी लपविलेल्या टि.व्ही. ग्राहकांचे सर्वेक्षण करुन शासनास अधिकाधिक करमणूक कराचा महसूल मिळण्यासाठी शासनातर्फे कोणती उपाययोजना करण्यात आली आहे वा येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०९-१२-२०१६)** :(१) होय.
माहे एप्रिल, २०१५ ते डिसेंबर, २०१५ या ९ महिन्यांच्या कालावधीत मुंबई शहर व मुंबई उपनगर या दोन जिल्ह्यांमध्ये डिटीएच आणि केबल टि.व्ही. च्या ग्राहकांकडून महाराष्ट्र करमणुक शुल्क अधिनियमातील तरतुदीनुसार रु.५४३३.२१ लाख इतक्या रकमेचा करमणूक शुल्काची वसूली करण्यात आली आहे.
(२) माहे मार्च, २०१६ अखेर पर्यंत संपूर्ण राज्यात डिटीएच आणि केबल टि.व्ही. जोडण्यांच्या माध्यमातून रु.३६,६५०.४१ लाख इतक्या रकमेच्या करमणुक शुल्काची वसूली करण्यात आली आहे.
(३) माहे मार्च, २०१६ अखेर मुंबई शहर व मुंबई उपनगर या दोन जिल्ह्यांमध्ये एकूण केबल जोडण्यांची व डिटीएच ग्राहकांची संख्या अनुक्रमे ८,३०,७१३ आणि ६,६७,१९० इतकी आहे.
माहे मार्च, २०१६ अखेर मुंबई शहर व मुंबई उपनगर या दोन माध्यमातून अनुक्रमे रु.४०८५.२२ लाख व रु.४१५८.९३ लाख इतक्या रकमेच्या करमणूक शुल्काची वसूली करण्यात आली आहे.

(४) दि.२६.०३.२०१५ च्या शासन परिपत्रकातील तरतूदीनुसार राज्यातील प्रत्यक जिल्ह्यांत क्षेत्रीय स्तरावर स्थानिक केबल परिचालक (L.C.O.) व बहुविध यंत्रणा परिचालक (M.S.O.) यांचे विनाक्रम सर्व्हेक्षण करण्यात येते. सदर विनाक्रम सर्व्हेक्षणामध्ये घोषित केबल जोडण्यापेक्षा जास्तीच्या आढळलेल्या केबल जोडण्यासंदर्भात संबंधित केबल चालकांविरुध्द महाराष्ट्र करमणूक शुल्क अधिनियमातील विहित तरतूदींनुसार दंडात्मक कारवाई करण्यात येते.

याशिवाय सदर अधिनियमातील कलम-५ मध्ये सुधारणा करुन करमणुक शुल्क चुकवेगिरीच्या प्रकरणांत दंडात्मक कारवाई करण्याचे अधिकार जिल्हाधिकाऱ्यांना प्रदान करण्यात आले आहेत. त्यानुसार, करमणूक शुल्क वसूलीच्या अनुषंगाने क्षेत्रीय पातळीवर कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नालासोपारा (जि.पालघर) येथील कारगिलनगर व त्या लगतच्या सुपारक बाग येथील सरकारी जमीनीवर अतिक्रमण करुन बांधण्यात आलेल्या २५ इमारतींचे बांधकाम नियमित करण्याबाबत**

**(१३) ४४५९० (२०-०४-२०१६). श्री.वैभव नाईक (कुडाळ), श्री.पास्कल धनारे (डहाणू), श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नालासोपारा (जि.पालघर) येथील कारगिलनगर व त्या लगतच्या सुपारक बाग येथील सरकारी जमीनीवर अतिक्रमण करुन बांधण्यात आलेल्या २५ इमारतींचे बांधकाम नियमित करण्याबाबत इमारतीमध्ये राहणाऱ्या रहिवाश्यांच्या सोसायटयांनी शासनाकडे निवेदनाद्वारे दिनांक १६ ऑक्टोंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास मागणी केली आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास चौकशीत काय आढळून आले व त्या अनुषंगाने उक्त निवेदनावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२९-११-२०१६) :**(१) मुख्य प्रवर्तक सुपारक नगर को.हौ.सो. नालासोपारा व मुख्य प्रवर्तक, कारगिलनगर को.हौ.सो. विरार यांनी तत्कालीन मा.महसूल मंत्री, महाराष्ट्र राज्य यांचेकडे दि.१६/१०/२०१५ रोजी निवेदन दिले आहे.

(२), (३) व (४) कारगीलनगर को.हौ.सो. यांनी मागणी केलेली मौजे विरार ता.वसई येथील स.न. १६२/२ब, १६२/३ ब पै. व १६२/४ ब ही शासकीय जमीन नवीन अविभाज्य शर्तीवर मुळ आदिवासी धारकाला प्रदान केली असून सदर जमिनीस महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६ मधील कलम ३६ अ च्या तरतुदी लागू आहेत. मात्र विषयांकित जमीन आदिवासी खातेदाराचे नावावर असताना त्यावर त्रयस्थांकडून अनधिकृत बांधकामे करण्यात आली असून विनापरवानगी बिनशेती वापर सुरु आहे. उपसंचालक, नगररचना वसई-विरार शहर महारगनरपालिका यांचे अभिप्रायानुसार सदर जमीन हरितक्षेत्र (ग्रीन झोन एरिया) विभागात

येत असून सदर जमिनीवरील बांधकामे नियमानुकुल करता येत नाहीत. त्यामुळे सदर शासकीय जमीन निवासी प्रयोजनासाठी अर्जदार सहकारी गृहनिर्माण संस्थेस मंजूर करणे शक्य नाही.

त्याचप्रमाणे सुपारक नगर को.हौ.सो. यांनी मागणी केलेली मौजे सोपारा ता.वसई येथील स.न. ३२ अर व ३२अ १अ अ १ अ १ ही शासकीय जमीन वसई विरार शहर महानगरपालिकेने मंजूर विकास आराखड्यात विविध सार्वजनिक प्रयोजनांसाठी (उदा. बस डेपो, खेळाचे मैदान, डी.पी. रस्ता, अग्निशमन कैंद्र इ.) आरक्षित केलली आहे. या बाबींच्या विचार करता सदर शासकीय जमीन निवासी प्रयोजनासाठी अर्जदार सहकारी गृहनिर्माण संस्थेस मंजूर करणे शक्य नाही. असा निर्णय शासन स्तरावर घेण्यात आला आहे.

---

**मुंबई-पुणे महामार्गालगत सारसन हद्दीत असणारा नैसर्गिक नाला एक्सप्रेस ट्रक टर्मिनल कंपनीने बुजविल्याने या परिसरात निर्माण झालेल्या पूरपरिस्थितीबाबत**

**(१४) ४४६६२ (२९-०४-२०१६). श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई-पुणे महामार्गालगत सारसन हद्दीत असणारा नैसर्गिक नाला एक्सप्रेस ट्रक टर्मिनल कंपनीने बुजविल्याने या परिसरात पूरपरिस्थिती निर्माण झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत सांजगाव ग्रामपंचायतीने सार्वजनिक बांधकाम विभाग, अलिबाग तसेच शासनाकडे माहे डिसेंबर, २०१५ मध्ये लेखी तक्रारी केल्या आहेत, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, नैसर्गिक नाला बुजविणाऱ्या ठेकेदारांवर व ट्रक टर्मिनल कंपनीवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०९-११-२०१६) :**(१) नाही.

(२) होय.

(३) सारसन येथील सदर जागेवर ट्रक टर्मिनस उभारण्याच्या कामाकरीता कार्यारंभ आदेश दि.९.०१.२०१५ रोजी देण्यात आला कार्यकारी अभियंता रायगड पाटबंधारे विभाग यांनी प्रमाणित केलेल्या नकाशानुसार सारसन येथील ट्रक टर्मिनसची जागा ही पश्चिम बाजुला दक्षिणेकडून उत्तरेकडे वाहणाऱ्या पाताळगंगा नदीच्या पोट नाल्यांपासून क्षेत्राची सिमा ३०.०० मी. (तीस मीटर) व उत्तरेकडील पाताळगंगा नदीचे पात्रा पासून ५५०.०० मी. (पाचशे पंन्नास मीटर) क्षितिज समांवर अंतरावर आहे (सोबत पत्राची प्रत). या व्यतिरिक्त पावसाच्या पाण्याचा नीचरा करण्यासाठी सदर ट्रक टर्मिनसच्या हद्दीतून सध्याच्या गरजेपेक्षा दुप्पट क्षमतेचे (प्रत्येकी ९०० mm चे) दोन पाईप घालण्यात आले आहेत. तसेच जिल्हाधिकारी, रायगड यांनी वाणिज्यिक प्रयोजनासाठी मंजूर नकाशाप्रमाणे बांधकामास परवानगी दिली असल्याने कारवाई प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**उदगीर (जि.लातूर) येथे शासनाच्या नभोवाणी विभागाच्या परवानगी शिवाय चालत असलेल्या न्युज चॅनलकडून कायदा व सुव्यवस्था बिघडवण्याच्या बातम्या प्रसारीत होत असल्याबाबत**

**(१५) ४४७३८ (२०-०४-२०१६). श्री.सुधाकर भालेराव (उदगीर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उदगीर (जि.लातूर) येथे शासनाच्या नभोवाणी विभागाच्या परवानगी शिवाय चालु असलेले न्युज चॅनल्स कायदा व सुव्यवस्था बिघडवण्याबाबतच्या बातम्या प्रसारीत करीत असल्याबाबत तक्रार माहे ऑक्टोबर, २०१५ च्या दरम्यान येथील स्थानिक लोकप्रतिनिधींनी केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महसुल विभागाने या अनधिकृत न्यूज चॅनल व केबल चालकांची चौकशी करुन शासनाकडे अहवाल सादर केला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महसुल विभागाने शासनास अहवाल सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या अहवालानुसार, करमणूक शुल्क अधिनियमाच्या तरतूदीन्वये केबल चालक व अनधिकृत न्यूज चॅनल चालकावर कोणती कारवाई करण्यात आली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०९-११-२०१६) :**(१) उदगीर, जि.लातूर येथील समर्थ केबल नेटवर्कद्वारे दाखविण्यात येणारे अनधिकृत न्यूज चॅनल तात्काळ बंद करावे व केबल चालकांची चौकशी करुन गुन्हे दाखल करावे, अशा आशयाची तक्रार स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दि.१८.१०.२०१५ रोजी जिल्हाधिकारी कार्यालय, जि. लातूर यांचेकडे केली होती.

(२), (३) व (४) दि.२६/०३/२०१५ च्या शासन परिपत्रकातील तरतुदींनुसार राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात क्षेत्रीय स्तरावर स्थानिक केबल परिचालक (L.C.O.) व बहुविध यंत्रणा परिचालक (M.S.O.) यांचे विनाक्रम सर्व्हेक्षण करण्यात येते. सदर तरतुदींनुसार तहसिलदार, उदगीर, जि.लातूर यांचेकडून प्रस्तुत प्रकरणी उदगीर जि.लातूर येथे करण्यात आलेल्या केबल जोडण्यांच्या सर्व्हेक्षणात आढळून आलेल्या अतिरिक्त जोडण्यांवर महाराष्ट्र करमणूक शुल्क अधिनियमातील तरतुदींनुसार जिल्हाधिकारी कार्यालय लातूर यांचेद्वारे करमणूक शुल्काच्या रकमेची व त्यावरील दंडात्मक व्याजाच्या रकमेची आकारणी करण्यात आलेली आहे.

तथापि, जिल्हाधिकारी कार्यालय, लातूर यांच्या सदर आदेशाविरुध्द संबंधित केबल चालकांनी विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांच्याकडे अपील दाखल केले असून सदर अपिलासंदर्भात होणाऱ्या निर्णयाच्या अनुषंगाने विहित नियमांनुसार आवश्यक ती कार्यवाही संकल्पित आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कल्याण तालुक्यातील नेवाळी विमानतळाची जागा शेतकऱ्यांना परत करण्याबाबत**

**(१६) ४४९१० (२०-०४-२०१६). श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण तालुक्यातील ब्रिटीश कालीन नेवाळी विमानतळाची वापराविना पडून असलेली जागा शेतकऱ्यांना परत करण्याची मागणी मा.लोकप्रतिनिधी यांनी जिल्हाधिकारी यांच्याकडे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान केल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मा.लोकप्रतिनिधी यांनी उक्त प्रकरणी केलेल्या मागणीनुसार शासनाने निर्णय घेऊन सदर जमीनी शेतकऱ्यांना परत करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२९-११-२०१६) :**(१) होय, हे अंशत: खरे आहे.

मा.आमदार श्री.गणपत काळू गायकवाड यांच्या जिल्हाधिकारी, ठाणे यांना दिलेल्या निवेदनाची प्रत दि. ११.५.२०१५ रोजी दिलेली आहे.

(२) जिल्हाधिकारी, ठाणे यांचेकडून प्राप्त अहवालाच्या अनुषंगाने नमूद करण्यात येते की, नेवाळी विमानतळासाठी Defence of India Rules, Rule नुसार कल्याण व अंबरनाथ तालुक्यातील जमीन अधिग्रहीत (Requisition) करण्यात आली आहे. अंबरनाथ तालुक्यातील मौजे चिंचवली, आंबोशी, वसार, भाल, नेवाळी, आडीवली, द्वारली, मांगरुळ व काकडवाल या गावातील एकूण ४२१.६३.५ हे. आर जमीन अधिग्रहीत करण्यात आलेली आहे. सदर जमिनी ह्या नेवाळी एरोड्रम, संरक्षण मंत्रालय, भारत सरकार यांचे नावे करण्याबाबत उपविभागीय अधिकारी उल्हासनगर यांचेकडील आदेश क्र.आरटी.एस/अपील नं. ९३/२०१०, दि.२०.९.२०१० अन्वये आदेश देण्यात आले आहेत.

कल्याण तालुक्यातील मौज नेतीवली, नांदिवली उर्फ अंबरनाथ, खोणी, वडवली बु. व धामटण या गावातील एकूण क्षेत्र २५५.४१.९ हे. आर क्षेत्र तसेच तिसगाव, पिसवली या गावातील एकूण क्षेत्र ५.५४.० हे. आर. नेवाळी विमानतळासाठी अधिग्रहीत करणेत आले आहे. सदर संपादित केलेली जमीन नेवाळी एरोड्रम यांचे नावे दाखल असून जमिनीची माहे एप्रिल व मे, २०१५ रोजी मोजणी करुन डिफेन्स इस्टेट ऑफिसर, मुंबई यांना हद्दी दर्शविण्यात आलेल्या आहे.

सदर जमीन केंद्र शासनाच्या संरक्षण विभागाची असल्याने सदर बाब केंद्र शासनाच्या अखत्यारितील आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**भिवंडी तालुक्याच्या (जि.ठाणे) खाडी किनाऱ्यावर बनावट कागदपत्रे दाखवून गोडाऊनचे अनधिकृत बांधकाम केल्याबाबत**

**(१७) ४५२१० (२०-०४-२०१६). श्री.राज पुरोहित (कुलाबा), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्री.विजय औटी (पारनेर), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), श्री.संजय केळकर (ठाणे) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडी तालुक्याच्या (जि.ठाणे) खाडी किनाऱ्यावर बनावट कागदपत्रे दाखवून गोडाऊनचे अनधिकृत बांधकाम केले असल्याची बाब दिनांक ११ जानेवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर बेकायदा गोडाऊनचे बांधकाम करून केलेली फसवणूक थांबविण्यासाठी जोपर्यत बांधकामाची सत्यता पडताळणीचे काम पूर्ण होत नाही तोपर्यत बांधकामाच्या खरेदी-विक्रीची नोंदणी करु नये असे जिल्हाधिकारी यानी संबंधिताना आदेश दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी आतापर्यत किती लोकांवर अशा प्रकारच्या कारवाया करण्यात आल्या आहेत,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२९-११-२०१६) :**(१) मौजे कशेळी, गुंदवली, दापोडे, दिवे, अंजूर, ता.भिवंडी, जि.ठाणे या गावाच्या हद्दीलगत खाडी किनारी सरकारी नाल्याच्या क्षेत्रापासून ५० मीटरच्या आत गोडाऊनचे बांधकाम केल्याचे दि.१६/११/२०१५ रोजी उप विभागीय अधिकारी, भिवंडी यांच्या निदर्शनास आले आहे.

(२) नागरिकांची फसवणूक थांबविण्याच्या दृष्टीने व अनधिकृत बांधकाम करणाऱ्या व्यकतींना/प्रवृत्तीला आळा घालण्याच्या दृष्टीकोनातून मौजे गुंदवली, ता.भिवंडी, जि.ठाणे येथील स.नं. २/१ व इतर या मिळकतींवरील गाळ्यांच्या /गोडाऊनच्या खरेदी-विक्रीचे व्यवहार नोंदणीकृत करु नयेत, असे जिल्हाधिकारी, ठाणे यांनी सह जिल्हा निबंधक, ठाणे यांना दि.०१/१२/२०१५ च्या पत्रान्वये कळविले आहे.

(३) व (४) संबंधित विकासक यांच्याविरुध्द पर्यावरण संरक्षण अधिनियम, १९८६ च्या तरतूदी अन्वये नारपोली पोलीस स्टेशन येथे दि.१६/११/२०१५ रोजी गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

---

**नागज ते कराड हा मार्ग राष्ट्रीय महामार्गातून वगळण्यात आल्याबाबत**

**(१८) ४५३२७ (२९-०४-२०१६). श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विजापूर ते नागज या राज्य मार्ग क्रमांक १३६ मधील मार्ग राष्ट्रीय महामार्गात रुपांतरीत करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्य मार्गातील नागज ते कराड हा मार्ग राष्ट्रीय महामार्गातून वगळण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, नागज ते कराड हा मार्ग राष्ट्रीय महामार्गातून वगळण्याचे कारण काय आहेत,
(४) असल्यास, नागज ते कराड हा मार्ग राष्ट्रीय महामार्गात रुपांतरीत करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०३-०१-२०१७)** :(१) होय, हे खरे आहे.
(२) नाही.
सद्य:स्थितीत नागज ते कराड हा मार्ग राष्ट्रीय महामार्गात समाविष्ट केला आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### नागनवाडी व आसगाव (ता.चंदगड, जि.कोल्हापूर) ताम्रपर्णी नदीवर साकव बांधण्याबाबत

**(१९) ४५३७२ (२१-०४-२०१६). श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.हसन मुश्रीफ (कागल) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोल्हापूर जिल्हयातील चंदगड तालुक्यात नागनवाडी व आसगाव ताम्रपर्णी नदीवर साकव बांधण्याबाबत गत २० वर्षापासून शासनाकडे आसगाव-पाटीलवाडा चुरणीचा वाडा येथील ग्रामस्थांनी मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीत काय आढळून आले,
(३) असल्यास, तद्नुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२७-१२-२०१६)** :(१) होय, हे खरे आहे.
(२), (३) व (४) विषयांकित साकव बांधकाम करण्याकरीता त्याबाबतचे अंदाजपत्रक प्रशासकीय मंजूरीसाठी जिल्हा नियोजन समिती, कोल्हापूर यांचेकडे सादर करण्यात आले आहे.

---

### राज्यातील जमिनीचे अकृषिक (एनए) परवाने देतांना विकास आराखडा मंजूर असलेल्या ठिकाणी जमीन एनए करण्याची अट रद्द करण्याबाबत

**(२०) ४५५७६ (२०-०४-२०१६). श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक), श्री.सदा सरवणकर (माहिम), डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा), श्री.संदीपानराव भुमरे (पैठण), श्री.संग्राम थोपटे**

**(भोर), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.भारत भालके (पंढरपूर), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील जमिनीचे अकृषिक (एनए) परवाने देतांना विकास आराखडा मंजूर असलेल्या ठिकाणी जमीन एनए करण्याची अट रद्द करण्याचा शासनाने माहे जानेवारी, २०१६ मध्ये निर्णय घेतला आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निर्णयाचे स्वरुप काय आहे व निर्णयाची राज्यात अंमलबजावणी झाली आहे काय,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०९-११-२०१६) :**(१) व (२) दि.२२/०८/२०१४ रोजी राजपत्रात अधिसूचित अध्यादेश क्र.१७/१४ व तद् नंतर दि.२२/१२/२०१४ च्या शासन राजपत्रात प्रसिध्द केलेल्या महाराष्ट्र अधिनियम क्र. ३७/१४ अन्वये महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ मध्ये कलम ४२ अ हे नवीन कलम समाविष्ट करण्यात आले आहे. त्यानुसार महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ च्या तरतुदींन्वये तयार करण्यात आलेल्या प्रारुप अथवा अंतिम विकास योजनेत निश्चित केलेल्या वापरानुसार जमिनीच्या वापरात बदल करण्यासाठी कलम ४२ अन्वये अकृषिक परवानगी घेण्याची आवश्यकता असणार नाही.

सदर तरतुदींच्या अनुषंगाने करावयाच्या कार्यवाहीबाबतची स्पष्टता, कार्यपध्दती व जबाबदारी शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्र, एनएपी-२०१६/प्र.क्र.७/टी-१, दि.२२.१.२०१६ च्या शासन निर्णयाद्वारे निश्चित करण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अकोला जिल्हा प्रशासनाकडून करमणूक कर वसुलीत दिरंगाई करण्यात येत असल्याबाबत**

**(२१) ४५५९५ (२०-०४-२०१६). श्री.हरिष पिंपळे (मुर्तिजापूर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला जिल्हा प्रशासनाकडून करमणूक कर वसुलीत दिरंगाई करण्यात आली असून चित्रपट गृहे, व्हिडीओ सिनेमा, डीटीएच केबल आदी साधनांमधून केवळ ४९ टक्के कर वसुलीचे उद्दीष्ट करमणूक कर विभागाने साध्य केल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, केवळ तीन महिने राहिले असून ५१ टक्के वसुली करण्याचे उद्दीष्ट अपुरे राहिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, १०० टक्के वसुली करुन उद्दीष्ट पूर्ण करण्याबाबत शासन काय कार्यवाही करणार आहे वा करण्यात आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०९-१२-२०१६)** :(१), (२) व (३) दि.०१.०६.२०१५ च्या शासन निर्णयान्वये सन २०१५-१६ या आर्थिक वर्षाकरीता अकोला जिल्ह्यासाठी निर्धारित करण्यात आलेल्या रु.५९० लाख इतक्या रकमेच्या करमणूक शुल्क वसुलीच्या उदिष्टापैकी माहे जानेवारी, २०१६ अखेर अकोला जिल्ह्याचे एकूण ६०.६०% इतक्या रकमेच्या करमणूक शुल्क वसुलीचे उद्दिष्ट साध्य झाले होते. सन २०१५-१६ या आर्थिक वर्षामध्ये अकोला जिल्ह्याकरिता निर्धारित करण्यात आलेले करमणूक शुल्क वसुलीचे उदिष्ट १००% पूर्ण करण्याकरीता जिल्हाधिकारी, अकोला यांचेमार्फत करमणूक शुल्क वसुली पथक नेमण्यात आले होते.

माहे मार्च, २०१६ अखेरीस अकोला जिल्ह्यात एकूण वसुली हि ४७०.८७ लाख इतक्या रकमांच्या करमणूक शुल्काची वसुलीस झाली असून सदर रक्कम ही सन २०१५-१६ आर्थिक वर्षाकरिता अकोला जिल्ह्यासाठी निर्धारित करण्यात आलेल्या करमणूक शुल्क उद्दिष्टाच्या ७९.८१% इतकी आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबईत प्रवेश करताना असलेल्या पाच टोल नाक्यांवर टोल भरण्यासाठी वेटींगवर असलेल्या गाड्यांमुळे तब्बल ६ हजार २६० कोटी रुपयांचे नुकसान होत असल्याबाबत**

**(२२) ४५९७६ (२९-०४-२०१६). श्री.राज पुरोहित (कुलाबा), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.बाळासाहेब सानप (नाशिक पूर्व), डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईत प्रवेश करताना असलेल्या पाच टोल नाक्यांवर टोल भरण्यासाठी वेटींगवर असलेल्या गाड्यांमुळे तब्बल ६ हजार २६० कोटी रुपयांचे नुकसान होत असल्याची माहिती माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू माहिती खुद्द रस्ते विकास महामंडळाने केलेल्या एका सर्वेक्षणातून समोर आली असून मुंबईतील राहणीमान, वाहनांना वेटींगमध्ये होणारा उशिर, वाहनांच्या किंमती व दर्जा बघता नुकसान होत असल्याचे अहवालात म्हटले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू नुकसान रोखण्याकरीता शासन काही ठोस उपाययोजना करणार आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०९-११-२०१६)** :(१) नाही.

(२) मुंबईतील पाच प्रवेश नाक्यांवर असा कोणताही अभ्यास करण्यात आलेला नाही.

(३) पथकर नाक्यावर कमीत कमी वेळ लागावा याकरिता उपलब्ध जागेत सध्या स्टॅगरिंग पध्दतीने काही अतिरिक्त मार्गिका बनविण्यात आल्या आहेत. तसेच या ठिकाणी वेळ कमी लागावा या दृष्टीने ईटीसी मार्गिका बनवून इलेक्टॉनिक पध्दतीने पथकर गोळा करण्याची प्रणाली पथकर नाक्यांवर सुरु करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राजमाची (ता.मावळ, जि.पुणे) गावामध्ये मुलभूत सोई सुविधा देण्याबाबत**

**(२३) ४५९८० (०६-०५-२०१६). श्री.संजय (बाळा) भेगडे (मावळ) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्हा-मावळ तालुक्यातील लोणावळ्या पासून १८ कि.मी दूर असलेल्या रस्त्याची दुरवस्था झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राजमाची गावात एसटी बस नाही यामुळे खाजगी मालवाहतूकीतून ये-जा करावी लागत आहे तसेच गावात दवाखाना नसल्याने वृद्ध, गरोदर महिला, लहान मुले यांची खूप मोठ्या प्रमाणावर गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) या गावात स्मशानभूमी नसुन, एप्रिल महिन्यानंतर पाण्याची तीव्र टंचाई निर्माण होत आहे, तसेच गावात प्राथमिक शाळा नसुन, वीज, नागरिकांकडे जातीचे दाखले नसल्यामुळे शेतकरी शासकीय योजनांपासून वंचित आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, राजमाची गावामध्ये सोई सुविधा पुरविण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०२-०१-२०१७) :**(१) होय. हे अंशतः खरे आहे.

प्रश्नांकित रस्ता प्रजिमा १४६ आहे. हा रास्ता जिल्हा परिषद, पुणे यांच्याकडून सार्वजनिक बांधकाम विभागाकडे २०१३ मध्ये हस्तांतरीत करण्यात आला आहे. या रस्त्याचा कि.मी. ३/०० ते ५/०० या लांबीतील भाग नगरपरिषद लोणावळा यांच्या ताब्यातील आहे. रस्त्याची एकूण लांबी २३.८०० कि.मी. आहे. रस्त्याचा कि.मी.१०/०० ते २३/८०० हा भाग वनक्षेत्रातील आहे. या १३.८०० कि.मी. लांबीपैकी ४.३०० कि.मी. लांबीत खडीच्या पृष्ठभागाचा व उर्वरित ९.५०० कि.मी. लांबीत मातीच्या पृष्ठभागाचा रस्ता आहे. वन खाते या लांबीत रस्त्याचे कोणतेही दुरुस्तीचे काम करण्यास परवानगी देत नाही. रस्त्याचा कि.मी. ०/०० ते १०/०० या लांबीतील भाग सुस्थितीत आहे.

रस्त्याच्या खडीच्या व मातीच्या पृष्ठभागाच्या लांबीतील डांबरीकरणाचे काम वन विभागाची परवानगी मिळवून मंजूरी, निधी, निकष व प्राधान्य क्रमानुसार हाती घेणेचे नियोजन आहे.

(२) अंशतः खरे आहे.

(३) अंशतः खरे आहे.

(४) राजमाची गावात आवश्यक सोई सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबतचा प्रस्ताव स्थानिक स्वराज्य संस्थेकडून जमिनीच्या कागदपत्रासह प्राप्त झाल्यावर त्यानुसार याबाबत आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**ग्रामीण भागातील शेतजमीन अकृषिक करण्यासाठीच्या अधिमुल्य दरात कपात करण्याच्या निर्णयाबाबत**

**(२४) ४७१८२ (२०-०४-२०१६). श्री.राहूल कुल (दौंड), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.योगेश टिळेकर (हडपसर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ग्रामीण भागातील शेतजमीन अकृषिक करण्यासाठीच्या अधिमुल्य (प्रीमियम) दरात कपात करण्याच्या निर्णय राज्य शासनाने माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निर्णयाचे स्वरुप काय आहे व सदर निर्णयाची अंमलबजावणी करण्यासाठी काय कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०९-११-२०१६) :**(१) माहे जानेवारी, २०१६ वा त्या दरम्यान असा निर्णय घेण्यात आलेला नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**चांदवड (जि.नाशिक) येथील प्रशासकीय इमारतीतील सोयी सुवधांचा अभाव**

**(२५) ४७२८९ (२०-०४-२०१६). डॉ.राहूल आहेर (चांदवड) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चांदवड (जि.नाशिक) येथे कोट्यवधी रुपये खर्च करुन बांधण्यात आलेली प्रशासकीय इमारत तीन महिन्यांपूर्वी सुरु झाली असूनही येथे पिण्याच्या पाण्याची सोय व इतर सोयीसुविधां उपलब्ध नसल्याने अधिकारी, कर्मचारी व नागरिकांची अत्यंत गैरसोय होत असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास नव्याने बांधण्यात आलेली ही प्रशासकीय इमारत १ किमी मिटर लांब असल्याने व जवळ कोणत्याही सुविधा नसल्याने नागरिक त्रस्त झाले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने प्रशासकीय इमारतीत पिण्याच्या पाण्यासह इतर सर्व सोयीसुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही करणार आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०८-१२-२०१६) :**(१) व (२) हे खरे नाही.

(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**चाळीसगाव व भडगाव (जि.जळगाव) गावांमधून जाणारे जामदा, कोळगाव, गुढे येथील अरुंद पुलाचे काम अपूर्णावस्थेत आल्याबाबत**

**(२६) ४७७३८ (१४-०५-२०१६). श्री.किशोर पाटील (पाचोरा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चाळीसगाव व भडगाव (जि.जळगाव) गावांमधून जाणारे जामदा, कोळगाव, गुढे येथील कालव्याच्या अरुंद पुलाकडे सार्वजनिक बांधकाम विभाग व पाटबंधारे विभागाचे दुर्लक्ष होत असल्याने या ठिकाणी अपघातांचे प्रमाण वाढले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या अरुंद पुलाचे काम तातडीने करण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०४-०१-२०१७) :**(१) होय, हे अंशत: खरे आहे, जलसंपदा विभागाने बांधलेले कालव्यावरील पुल मानकानुसार आवश्यक असलेल्या रुंदीपेक्षा अरुंद आहेत. सदर पुलावरुन वाहतुक सुस्थितीत चालू आहे. संबंधित पोलीस स्टेशनवरील नोंदीनुसार मागील ३ वर्षात या ठिकाणी अपघात झालेले नाहीत.

(२) पूलांच्या रुंदीकरणाचे काम मंजूरी, निधी, निकष व प्राध्यान्यक्रमानुसार हाती घेण्याचे नियोजन आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कढोली (ता.कुरखेडा, जि.गडचिरोली) येथील प्रशासकीय इमारतीचे बांधकाम अपुर्णावस्थेत असल्याबाबत**

**(२७) ४८५६५ (२९-०४-२०१६). श्री.कृष्णा गजबे (आरमोरी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कढोली (ता.कुरखेडा, जि.गडचिरोली) येथील प्रशासकीय इमारतीचे बांधकाम मागील चार वर्षापासून अद्यापही पुर्ण झाले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रशासकीय इमारतीचे बांधकाम अपूर्ण अवस्थेत असण्याचे कारण काय,

(३) असल्यास, उक्त बांधकामाच्या देयकांची रक्कम कंत्राटदाराला अदा केली आहे काय,

(४) असल्यास, बांधकाम पूर्ण न करताही देयकाची रक्कम अदा करणाऱ्या अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०४-०१-२०१७) :**(१) हे खरे आहे.

(२) निधी अभावी देयकाचे भुगतान कंत्राटदारास वेळोवेळी न मिळाल्यामुळे कंत्राटदाराने काम बंद केले होते. कंत्राटदाराने बांधकामाला सुरुवात केलेली आहे. सद्य:स्थितीत आ.सी.सी. चे लिंटेल लेव्हल पर्यंत बांधकाम पूर्ण झालेले असून १/३ भागाचा स्लॅब झालेला आहे. तसेच संरक्षण भिंतीचे काम पूर्ण झाले आहे. सदर काम प्रगतीत आहे.

(३) कंत्राटदाराने काम बंद करण्यापूर्वी जेवढे काम केले त्या कामाचे चालु देयक निधीच्या उपलब्धतेनुसार अदा करण्यात आले आहे.
(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**वसई-विरार महानगरपालिका हद्दीतील आरक्षित जागा आगरी समाज विकास मंडळास देण्याच्या मागणीबाबत**

**(२८) ५२४४५ (२१-०४-२०१६). श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वसई-विरार महानगरपालिका हद्दीतील मौजे दिवाणमाने मा.वसई येथील सर्व्हे नं. १७६ मधील प्रस्तावित आरक्षण क्र. ५९४ क मधील ३१२५.३२५ चौ.मी. व १२ मी रुंदीचा डी.पी. रोड आरक्षित जागा आगरी समाज विकास मंडळ, वसई या संस्थेस देण्याबाबचे निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.महसूल मंत्री यांचेकडे दिनांक १८ ऑगस्ट, २०१४ रोजी वा त्यासुमारास दिले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त निवेदनातील प्रमुख मागण्या कोणत्या आहेत,
(३) असल्यास, सदरहू मागणी मान्य करण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२९-११-२०१६) :**(१), (२) व (३) होय, हे खरे आहे. वसई-विरार शहर महानगरपालिका हद्दीतील मौजे दिवाणमान येथील माध्यमिक शाळा व समाजकेंद्र यासाठी आरक्षित असलेली सर्व्हे नं.१७६ ही शासकीय जमीन आगरी समाज विकास मंडळ, वसई यांना शाळेसाठी व सामाजिक सुविधा केंद्र (CFC) बांधण्यासाठी मिळण्यासंदर्भात मा.मुख्यमंत्री महोदयांना दिनांक १८.११.२०१५ व दिनांक २३.०२.२०१६ च्या पत्रान्वये स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी विनंती केलेली आहे. त्यानुषंगाने शासनपत्र दिनांक २६.०४.२०१६ अन्वये जिल्हाधिकारी, पालघर यांना उपरोक्त विषयाबाबत अहवाल सादर करण्याबाबत सूचना देण्यात आलेल्या आहेत उक्त अहवाल शासनास प्राप्त झाल्यानंतर शासनाच्या प्रचलित धोरणानुसार योग्य तो निर्णय घेण्याचे संकल्पित आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**वांद्रे मुंबई येथील मागास मुलांच्या वसतीगृहासाठी राखीव असणारा भूखंड अनधिकृत मे.असोसिएटेड जर्नल्सला वितरीत केल्याबाबात**

**(२९) ५३७८८ (१९-०८-२०१६). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वांद्रे मुंबई येथील मागासवर्गीय मुलांच्या वसतिगृहासाठी राखीव असणारा भूखंड अनधिकृत मे.असोसिएटेड जर्नल्सला, वितरीत केल्याबाबतच्या प्रकरणी नेमलेल्या चौकशी समितीने अहवाल सादर केला असून या अहवालावर सुरु असलेली छाननीची कार्यवाही अद्याप पूर्ण झाली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास,चौकशीच्या अनुषंगाने छाननीची सुरु असलेली कार्यवाही पूर्ण करुन बेकायदा वितरीत केलेला भूखंड रदद करण्याबाबत तसेच सदर भूखंडाचा बेकायदा वापर केल्याबाबत शासनाने उक्त संस्थेविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२९-११-२०१६)** :(१) सदर अहवालावरील छाननीची कार्यवाही विभागाच्या स्तरावर पूर्ण झाली आहे.

(२), (३) व (४) सदर अहवालाच्या अनुषंगाने पुढील उचित निर्णय घेण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

---

**पन्हाळा, ज्योतिबा आणि रत्नागिरीकडे जाण्यासाठी महत्वाचा असलेल्या शिवाजी पुलाचे काम बेकायदेशीर झाले असल्याबाबत**

**(३०) ५४५५९ (२४-०८-२०१६). श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पन्हाळा,ज्योतिबा आणि रत्नागिरीकडे जाण्यासाठी महत्वाचा असलेल्या पर्यायी शिवाजी पुलाचे काम बेकायदेशीर झाले असल्याचे नुकतेच माहे मे, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान लोकप्रतिनिधींनी स्पष्ट केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त शिवाजी पुलाचे काम ७५ टक्के पूर्ण झाले असुन याकरिता आजपर्यंत सुमारे १० कोटी रुपयांचा खर्चही झालेला आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने सखोल चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, उक्त बेकायदेशीर पुलाचे बांधकामास केंद्रीय पुरातत्व विभागाची मान्यता नसतांनाही पुलास परवानगी देणा-या तसेच बेकायदेशीर पुलाच्या बांधकामास आतापर्यंत १० कोटी रुपयांचा खर्च करण्यास जबाबदार असणा-या संबधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०३-०१-२०१७)** :(१) हे खरे नाही.

(२) आजतागायत सुमारे ७०% काम पूर्ण झालेले आहे व खर्च सुमारे रु.१०.०० कोटी आलेला आहे.

(३) चौकशी बाबत प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**ब्रम्हपूरी व सिंदेवाही (जि.चंद्रपूर) येथे प्रशासकीय इमारत बांधण्याबाबत**

**(३१) ५५५०९ (२४-०८-२०१६). श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्हयातील ब्रम्हपूरी आणि सिंदेवाही येथील प्रशासकीय इमारतीचे बांधकाम करण्यासाठीचा १२ कोटी ६८ लक्ष रूपये आणि १० कोटी ५२ लक्ष रूपये अंदाजपत्रक असलेला प्रस्ताव माहे ३ मार्च, २०१५ च्या सुमारास सचिव बांधकाम विभाग यांच्याकडे अंतिम मंजूरी करीता पाठविण्यात आलेला असता तब्बल दिड वर्षापासून दोन्ही प्रस्ताव मंजूरीविना प्रलंबित ठेवण्यात आले असल्याचे दिनांक ५ जून, २०१६ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ब्रम्हपूरी येथील प्रशासकीय इमारत बांधकाम करण्याचा प्रस्ताव ५ कोटी रूपयांच्यावर असल्यामूळे बांधकाम सुकानु समितीने मंजूरी देवून सुध्दा वारंवार त्रुटया काढून सदर प्रस्ताव प्रलंबित ठेवण्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सिंदेवाही येथील प्रशासकीय इमारत बांधकाम करण्याचा प्रस्ताव ५ कोटी रूपयांच्यावर असल्यामूळे अद्यापही बांधकाम सुकानु समितीसमोर ठेवण्यात आलेले नसल्यामूळेच मंजूरीविना सदर प्रस्ताव सार्वजनिक बांधकाम विभाग मंत्रालयात दिड वर्षापासून प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय

(४) असल्यास, या प्रस्तावास तातडीने मंजूरी देवून निधी उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केलेली आहे वा करण्यात येत आहे

(५) असल्यास, ब्रम्हपूरी आणि सिंदेवाही येथील प्रशासकीय इमारतीचे बांधकाम किती वर्षात पुर्ण करण्यात येणार आहे व त्याचा तपशिल काय आहे,नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०४-०१-२०१७) :**(१) अंशत: खरे आहे.

(२) ब्रम्हपूरी येथील तालुकास्तरीय मध्यवर्ती प्रशासकीय इमारतीच्या बांधकामाकरिता दि.२०/६/२०१६ अन्वये रु.१२४७.७६ लक्ष रकमेस प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

सिंदेवाही येथील प्रशासकीय कार्यालयाच्या इमारतीचे बांधकामाचा प्रस्ताव शासनास प्राप्त झाला आहे.

(३) व (४) सिंदेवाही येथील प्रशासकीय कार्यालयीन इमारतीस निधी व निकष याच्या अधिन राहून प्रशासकीय मान्यता देण्याचे नियोजीत आहे.

(५) ब्रम्हपुरी येथील कामाचे प्राथमिक स्वरुपाचे अंदाजपत्रक मान्यतेसाठी सादर करण्यात आले असून निधीच्या उपलब्धतेनुसार दोन वर्षात काम पूर्ण करण्याचे नियोजन आहे. सिंदेवाही येथील इमारत बांधकामाच्या प्रस्तावास प्रशासकीय मान्यता देण्याबाबतची कार्यवाही निधी व निकष या बाबीनुसार प्रगतीपथावर आहे.

---

**चांदूरबाजार (जि.अमरावती) येथील विश्रामगृहाच्या बांधकामाबाबत**

**(३२) ५५७९५ (२४-०८-२०१६). प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चांदूरबाजार (जि.अमरावती) येथील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिनस्त असलेल्या विश्रामगृहाच्या बांधकामावर झालेला लाखो रुपयांचा खर्च वाया जात असल्याचे माहे मार्च, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील विश्रामगृहाची नव्याने दुरुस्ती करुन अद्ययावत सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०४-०१-२०१७) :**(१) चांदूरबाजार विश्रामगृहाचे बांधकाम पूर्ण झाले असून सदर विश्रामगृहाच्या स्थापत्य व विद्युत बाबींसाठी आजतागायत रु.२९.९५ लक्ष इतका खर्च झाला आहे.

(२) व (३) सदर विश्रामगृहात फर्निचर व कर्मचारी उपलब्ध करुन ३ महिन्यात विश्रामगृह कार्यान्वित करण्यात येत आहे.

---

**वायगांव ते आष्टी (जि.अमरावती) या मार्गावरील झाडांची तस्करी**

**(३३) ५५८१४ (२४-०८-२०१६). प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्ह्यातील टाकरखेडा संभू येथून जवळच असलेल्या वायगाव ते आष्टी मार्गावरील अनेक झाडे बऱ्याच महिन्यापासून रस्त्याच्या कडेला कोलमडून पडली असून या संधीचा फायदा घेत चोरट्यांनी या झाडांची तस्करी केली असल्याचे माहे मार्च, २०१६ दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी करुन लाकूड तस्करी रोखण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१४-१२-२०१६) :**(१) हे खरे नाही.
(२) प्रश्न उद्‌भवत नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**पुणे नगर रस्त्यावर वाघोली, सणसवाडी, कोरेगाव भिमा व शिक्रापूर येथे उड्डाणपूल बांधण्याबाबत**

**(३४) ५६२४५ (२४-०८-२०१६). श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे-नगर रस्तावरील कोरेगाव भिमा येथे रस्त्यावर मोठया प्रमाणावर पाऊसाचे पाणी साठून वाहतूक कोंडी होत असते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पुणे नगर रस्त्यावर वाघोली, सणसवाडी, कोरेगाव भिमा व शिक्रापूर येथे वाहतूक कोंडी नेहमी होत असल्याने प्रवाश्यांना तासनतास वाहने घेवून रांगेत उभे रहावे लागते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सार्वजनिक बांधकाम व पीएमआरडीए यांच्या संयुक्त विद्‌यमाने या चारही ठिकाणी उड्डाणपूल बांधण्याचे प्रस्तावित करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त ठिकाणी उड्डाणपुल बांधण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली व करण्यात येत आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२७-१२-२०१६) :**(१) कोरेगाव भिमा येथे रस्ता सखल भागातून जात असून तेथे जोरदार अवकाळी पाऊसाचे पाणी साठल्याने वाहतूक काही काळ संथ गतीने जात होती. हे खरे आहे.
(२) पुणे नगर रस्त्यावरील वाघेली, सणसवाडी, कोरेगाव भिमा व शिक्रापूर येथे गर्दीच्या वेळेस/आठवडी बाजाराच्या दिवशी वाहतूक विस्कळीत होते.
(३) व (४) अहमदनगर पुणे रस्ता नव्याने राष्ट्रीय महामार्ग म्हणून तत्वत: घोषित करण्यात आला आहे.

---

**कर्जत तालुक्यातील (जि.रायगड) चौक-कर्जत रस्त्याची साईडपट्टी खोदून रिलायन्स कंपनीने केबल टाकल्याबाबत**

**(३५) ५६३७८ (२४-०८-२०१६). श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.हसन मुश्रीफ (कागल) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कर्जत खालापूर तालुक्यातील (जि.रायगड) रस्त्यांची साईडपट्टी खोदून त्याठिकाणी रिलायन्स व एअरटेल कंपनीने माहे एप्रिल, २०१६ मध्ये केबल टाकली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, केबल टाकण्याकरीता साईडपट्टी खोदण्याबाबत सार्वजनिक बांधकाम विभाग, कर्जत यांची परवानगी घेतली नाही हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, साईडपट्टी खोदल्यामुळे चांगला रस्ता पावसामुळे खचण्याची शक्यता निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत संबंधीत कंपन्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०५-१२-२०१६)** :(१) होय, हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### पालघर जिल्ह्यातील धोंडमाऱ्याची मेट व सभोवतालच्या परिसरातील सार्वजनिक बांधकाम विभागाने केलेल्या खडीकरण व डांबरीकरणाचे काम निकृष्ट दर्जाचे झाले असल्याबाबत

**(३६) ५६५९८ (२४-०८-२०१६). श्री.अजय चौधरी (शिवडी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पालघर जिल्ह्यातील धोंडमाऱ्याची मेट व सभोवतालच्या परिसरातील सार्वजनिक बांधकाम विभागाने केलेल्या खडीकरण व डांबरीकरणाचे काम निकृष्ट दर्जाचे झाले असल्याबाबतच्या तक्रारी वाहनचालक, प्रवासी व स्थानिक गावपाड्यातील लोकांनी माहे मे, २०१६ मध्ये व तत्पुर्वी अनेक वेळा सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांकडे केल्या आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर तक्रारीच्या अनुषंगाने रस्त्याचे निकृष्ट दर्जाचे काम करणाऱ्या ठेकेदाराविरुध्द काय कारवाई करण्यात आली आहे व सदर रस्ता दर्जेदार बनविण्यासाठी कार्यवाहीची सद्य:स्थिती काय आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२७-१२-२०१६)** :(१), (२) व (३) पालघर जिल्ह्यातील धोंडमाऱ्याची मेट जोडणाऱ्या रस्त्याचे खडीकरण वा डांबरीकरणाचे काम सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत करण्यात आलेले नाही.

तथापि नाशिक जिल्ह्यातील त्र्यंबकेश्वर तालुक्यातील प्रश्नांकित धोंडमाऱ्याची मेट च्या परिसरातील राज्य मार्ग २३ ते चंद्राची मेट, ठाणे जिल्हा हद्द कि.मी. १/०० ते ३/२०० हे काम सार्वजनिक बांधकाम विभागाअंतर्गत आहे. या रस्त्याचे बी.बी.एम. कारपेट सिलकोट पूर्ण झाले असुन काम सुस्थितीत आहे. सदर कामाचे अंमि देयक अद्याप अदा करण्यात आलेले नाही.

---

**बेळगाव-वेंगुर्ले या भविष्यात होणाऱ्या राज्यमार्गावरील गवसे फाटा ते बिजूर पर्यंतची वळणे काढण्याची मागणी**

**(३७) ५६९९० (२४-०८-२०१६). श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.हसन मुश्रीफ (कागल) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बेळगाव-वेंगुर्ले या भविष्यात होणाऱ्या राज्यमार्गावरील गवसे फाटा ते बिजूर पर्यतची वळणे काढण्याची मागणी मा.मुख्यमंत्री, मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री यांचेकडे काजिर्णे-म्हाळुंगे ग्रामस्थांनी माहे फेब्रुवारी, २०१६ मध्ये केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यांत येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२२-११-२०१६) :**(१) असे निवेदने प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही.

(२) व (३) प्रश्नांकित रस्ता रा.मा.क्र.१८० आहे. या रस्त्यावर कि.मी.८०/२०० मध्ये म्हाळुंगे गावाजवळ धोकादायक वळण आहे. या वळणाच्या दोन्ही बाजूस सूचना फलक उपलब्ध करुन देण्यात आले आहेत व रस्त्यावरील वाहतूक सुरळीत चालू आहे.

प्रस्तुत रस्ता केंद्र शासनाने राष्ट्रीय महामार्ग म्हणून घोषित केला आहे. या रस्त्याचे हस्तांतरण सार्वजनिक बांधकाम विभागाकडून केंद्र शासनाकडे करण्याची कार्यवाही प्रगतीत आहे. या रस्त्याची सुधारणा करणे व दुरुस्ती व देखभालीचे काम केंद्र शासनामार्फत करण्यात येणार आहे.

---

**कळंबोली (ता.पनवेल, जि.रायगड) येथील सरकारी वसाहतींची अतिशय दुरावस्था झाली असल्याबाबत**

**(३८) ५८४३९ (२४-०८-२०१६). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.विजय काळे (शिवाजीनगर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कळंबोली (ता.पनवेल, जि.रायगड) येथील सरकारी वसाहतींची अतिशय दुरावस्था झाली असून घाणीच्या साम्राज्यामुळे रहिवाशांच्या आरोग्याला धोका निर्माण झाले असल्याचे माहे मे २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तुटलेली गटारे, गटारांमधून वाहणारा मैला साचून येणाऱ्या दुर्गंधीमुळे नागरिकांच्या आरोग्याला धोका निर्माण झाला असून मोडकळीस आलेल्या इमारती पावसाळयात कोसळण्यामुळे जिवीत व वित्त हानी होण्याची शक्यता निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त सरकारी वसाहतींच्या दुरूस्तीचा प्रस्तावही मंजूर करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या दुर्लक्षामुळे रहिवाशांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागत असून उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून सरकारी वसाहतींच्या दुरूस्तीचे काम तातडीने सुरू करण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करीत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०८-११-२०१६)** :(१) कळंबोली येथील सरकारी वसाहतींची दुरावस्था झालेली नाही.

तथापि, मे २०१६ मध्ये के एल-४ येथील सिडको नवी मुंबई यांची मुख्य ड्रेनेज लाईनचा निचरा व्यवस्थित होत नव्हता हे अंशत: खरे आहे.
(२) माहे मे, २०१६ मध्ये सिडको नवी मुंबई यांची मुख्य ड्रेनेज लाईनचा निचरा व्यवस्थित होत नसल्यामुळे के एल-४ येथील निवासस्थानांच्या इमारतीच्या आवारातील चेंबर व गटार तुंबलेले होते. याबाबत अधिक्षक अभियंता, सा.बां. मंडळ, रायगड यांचेकडून सिडको कार्यालयास कळवून मुख्य ड्रेनेज लाईनची साफ सफाई करण्यात आलेली आहे. तसेच इमारती दुरुस्तीची किरकोळ कामे आवश्यकतेनुसार केली जातात व त्यामुळे सद्य:स्थितीत सन २०१६ च्या पावसाळ्यात इमारती कोसळण्याची शक्यता नसल्याने जिवीत व वित्त हानी होण्याची शक्यता दिसून येत नाही. गटारे, चेंबर यांची वेळोवेळी साफसफाई करण्यात येत असल्याने सध्या दुर्गंधी पसरली नाही.
(३) हे खरे आहे.
(४) इमारतींची किरकोळ दुरुस्तीची कामे जसे प्लॅस्टर, रंगकाम, मलनि:स्सारण वाहीनी व चेंबरची दुरुस्ती इत्यादी दुरुस्तीची कामे निविदा स्तरावर असून लवकरच कामे हाती घेवून पूर्ण करण्याचे नियोजन आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## चंद्रपूर जिल्हयातील ब्रम्हपूरी, सिंदेवाही आणि सावली येथील मुख्य रस्त्याचे सिमेंटक्राँक्रीटसह चौपदरीकरण करण्याबाबत

**(३९) ५८४७७ (२४-०८-२०१६). श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चंद्रपूर जिल्हयातील ब्रम्हपूरी शहरामधून मुख्य रस्त्यावरून नागपूर-वडसा, नागपूर-गडचिरोली हे राज्य मार्ग जात आहेत, तर सावली शहरामधून मुख्य रस्त्यावरून चंद्रपूर-गडचिरोली हा राज्य मार्ग जात आहे तसेच सिंदेवाही शहरामधून मुख्य रस्त्यावरून नागपूर-मूल हा राज्य मार्ग जात असून चारही रस्त्यावर मोठया प्रमाणात वाहतूक सुरू असून वर्दळीचे ठिकाण असल्याने चारही रस्त्यावर वांरवार अपघात होत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास ब्रम्हपूरी शहरातील १.ख्रिस्तानंद चौक ते वडसा रोडकडे जाणाऱ्या १ किमी रस्त्यापर्यंत, २.उराडे पेट्रोलपंप ते आरमोरी या दिड किमी रस्त्यापर्यंत, ३.सावली शहरातील कृषी उत्पन्न बाजार समिती नाकापासून तर ग्रामीण रूग्णालयापर्यंत दिड किमी रस्त्यापर्यंत, ४.सिंदेवाही शहरातील पर्वते पेटोलपंप ते दसरा चौक दोन किमी पर्यंत या चारही रस्त्यांचे सिमेंटक्रॉंकीटसह चौपदरीकरण करण्याबाबत सार्वजनिक बांधकाम विभाग, चंद्रपूर यांनी शासनाकडे वारंवार प्रस्ताव पाठवून सुध्दा अद्यापही मंजूरी देण्यात आलेली नसल्याची माहिती दिनांक ५ जून २०१६ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त रस्त्यांचे चौपदरीकरण करण्यात यावे असे निवेदन मा.मंत्री सार्वजनिक बांधकाम, मंत्री, वित्त व नियोजन, अप्पर मुख्य सचिव आणि सचिव सार्वजनिक बांधकाम विभाग यांना वारंवार दिले होते, हे ही खरे आहे काय

(४) असल्यास, या कामासाठी शासन प्रशासकीय मान्यतेसह निधी उपलब्ध करून देणार आहे काय, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२७-१२-२०१६)** :(१) अंशत: खरे आहे.

(२), (३) व (४) **ख्रिस्तानंद चौक ते वडसा रोडकडे जाणाऱ्या १ किमी रस्त्यापर्यंत---**सदरहू रस्ता ब्रम्हपूरी वडसा कुरखेडा कोरची ते राज्य सिमेपर्यंत केंद्र शासनाने राष्ट्रीय महामार्ग म्हणून तत्वत: मान्यता दिलेली आहे. राष्ट्रीय महामार्ग विभागाकडून डीपीआर तयार करण्याचे काम प्रगतीत आहे. सदरचा रस्ता सद्य:स्थितीत राष्ट्रीय महामार्ग विभागाच्या अखत्यारित नाही.

**उराडे पेट्रोलपंप ते आरमोरी या दिड किमी रस्त्यापर्यंत---** सदरचा रस्ता राष्ट्रीय महामार्ग क्र.३५३ डी म्हणून दर्जोन्न्त झाल्याने राष्ट्रीय महामार्ग विभागास हस्तांतरीत करण्यात आला आहे.

**सावली शहरातील कृषी उत्पन्न बाजार समिती नाकापासून तर ग्रामीण रुग्णालयापर्यंत दिड किमी रस्त्यापर्यंत---** सदर रस्ता राष्ट्रीय महामार्ग क्र.९३० म्हणून दर्जोन्नत झाल्याने राष्ट्रीय महामार्ग विभागास हस्तांतरीत करण्यात आला आहे.

**सिंदेवाही शहरातील पर्वते पेट्रोलपंप ते दसरा चौक दोन किमी पर्यंत--** सदर रस्ता प्रामा-९ दर्जाचा असून त्या रस्त्यावरील सिंदेवाही शहरातील कि.मी.१२९/८०० ते १३१/२०० ह्या लांबीचे चौपदरीकरण करण्याचे काम निकष, मंजूरी, निधी उपलब्धतेच्या अधीन राहून हाती घेण्याचे नियोजन आहे.

---

### कोल्हापूर शहरातील नागाळा पार्कात जिल्हाधिकारी कार्यालयासमोर असलेल्या महा-ई-सेवा केंद्रात विविध स्वरुपाच्या दाखल्यासाठी पैसे घेत असल्याबाबत

**(४०) ५९४६२ (१९-०८-२०१६). श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर शहरातील नागाळा पार्कात जिल्हाधिकारी कार्यालयासमोर असलेल्या महा-ई-सेवा केंद्रात विविध स्वरुपाच्या दाखल्यासाठी पैसे घेत असल्याची घटना दिनांक १ जून, २०१६ रोजीच्या सुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबतची माहिती महसूल प्रशानास असूनही अर्थपूर्ण व्यवहारामुळे या केंद्र चालकांवर कोणतीच कारवाई केली जात नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीनुसार पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२७-१२-२०१६)** :(१), (२), (३), (४) व (५) दि.०२.०६.२०१६ रोजीच्या वृत्तपत्रामध्ये अशा आशयाची बातमी प्रसिध्द झाली होती.

उक्त बातमीच्या अनुषंगाने करवीर तालुक्यातील सर्व महा-ई-सेवा केद्र चालकांची बैठक घेवून दाखल्यांसाठी शासनाने विहीत केलेल्या शुल्कापेक्षा अधिक शुल्क आकारणी करु नये अशा सुचना देण्यात आल्या आहेत.

महा-ई-सेवा केंद्रामध्ये दाखल्यासाठी विहीत शुल्का पेक्षा अधिक रक्कम आकारली जात असल्याबाबत करवीर तालुक्यात कोणतीही तक्रार प्राप्त झालेली नसून संबंधित कार्यालयामार्फत करण्यात आलेल्या तपासणी मध्ये अशी बाब आढळून आली नाही.

---

## भातुकली (जि.अमरावती) या तालुक्यातील कंत्राटदाराकडून अवैध वृक्षतोड करण्यात आल्याबाबत

**(४१) ५९६२९ (२४-०८-२०१६). प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भातुकली (जि.अमरावती) या तालुक्यात वादळी वाऱ्यामुळे रस्त्यावर दरवर्षी मोठया प्रमाणात वृक्षांची पडझड होत असल्याने वृक्षतोड करण्याची परवानगी कंत्राटारांना दिले जाते परंतु कंत्राटदार इतरही वृक्षांची अवैधरित्या वृक्षतोड करीत असल्याचे माहे जून, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कंत्राटदार व त्यांना मदत करणाऱ्या संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१४-१२-२०१६)** :(१) नाही, हे खरे नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबई-वडोदरा महामार्गासाठी ढोके, दापिवली, एरंजाड, भोज यासह १० गावातील शेतकऱ्यांना भूसंपादनाच्या नोटीस पाठविल्याबाबत**

**(४२) ६०२४६ (१९-०८-२०१६). श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई-वडोदरा महामार्गासाठी ढोके, दापिवली, एरंजाड, भोज यासह १० गावातील शेतकऱ्यांना भूसंपादनाच्या नोटीस माहे मे, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान पाठविल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या शेतकऱ्यांचे फेरफार प्रांतधिकाऱ्यांनी कोणतीही सुनावणी न घेता थेट बदलेले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जोपर्यंत बाजारभावाप्रमाणे योग्य मोबदला मिळत नाही तोपर्यंत सर्वेक्षण करु न देण्याचा इशारा तेथील ग्रामस्थांनी दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास चौकशीत काय आढळून आले व त्या अनुषंगाने भाजारभावाप्रमाणे योग्य मोबदला देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२९-११-२०१६) :**(१) होय, खरे आहे.

(२) अशी बाब आढळून आलेली नाही.

(३), (४) व (५) स्थानीक पातळीवर चर्चा होऊन शेतकऱ्यांना किती मोबदला देणार, त्याचे दर जाहीर होत नाही तोपर्यंत जमिनीची मोजणी प्रक्रिया करु नये अशीमागणी केली होती. याबाबत अपर जिल्हाधिकारी, ठाणे यांनी बाधित शेतकऱ्यांनी उपस्थित केलेल्या मुद्यांबाबत संबंधिताबरोबर दिनांक ५.७.२०१६ रोजी बैठक घेऊन याबाबत साधकबाधक चर्चा करण्यात आली. त्यानुसार संबंधित शेतकऱ्यांना विश्वासात घेऊन सर्व संमतिने संयुक्त मोजणीचा कार्यक्रम दिनांक ८.८.२०१६ ते २७.८.२०१६ या कालावधीत घेऊन १० गावाचे एकूण क्षेत्र १२६.९२०१ हेक्टर आर जमिनीचे संयुक्त मोजणीचे काम पूर्ण करण्यात आले आहे.

जमीनीचे मुलयांकन, जमिनीस संलग्न असलेले बांधकामाचे मुल्यांकन, निवासी घरांचे मुल्यांकन व बाधित होणाऱ्या कुटुंबाचे पुनर्वसन हे नवीन भूसंपादन कायदा, २०१३ नुसार करण्यात येणार आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कोल्हापूर जिल्हयातील ऑनलाईन सात-बारा उताऱ्यावर पीक पाण्याचा कॉलम नसल्याबाबत**

**(४३) ६१२७७ (१९-०८-२०१६). श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शेतकऱ्यांना तहसीलदार व तलाठी कार्यालयात वारंवार जावे लागू नयेत म्हणून राज्यात कोठेही सात बारा मिळण्याकरिता ऑनलाईन सात बारा उतारा मिळण्याची सोय करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर ऑनलाईन सात बारा उताऱ्यात पीकपाण्याचा कॉलम नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, पीकपाण्याचा कॅालम नसतानाही जिल्ह्यातून दहा लाखांहून अधिक मिळकतीची नोंदणी झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(५) असल्यास, चौकशीच्या अनुषगाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२७-१२-२०१६) :**(१) व (२) शासनाने https://mahabhulekh.maharashtra.gov.in या संकेतस्थळावरुन शेतकऱ्यांना संगणकीकृत गा.न.नं.७/१२ उतारा मिळवण्याची सोय उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने कार्यवाही हाती घेतली असून सदर संगणकीकृत नमुन्यातील गा.न.नं.१२ मध्ये पीकपाहणीचाही कॉलम उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे. तसेच पीकपाहणीच्या कॉलममध्ये पिकखालील क्षेत्राचा तपशील वर्षनिहाय व हंगामनिहाय दर्शविण्याची सोयही उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.
(३), (४), (५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मांजरसुम्भा- पाटोदा-आष्टी-कडा-धानोरा ते अहमदनगर**
**या राष्ट्रीय महामार्गाच्या कामाची सद्यस्थिती**

**(४४) ६२३९१ (२४-०८-२०१६). अॅड.भीमराव धोंडे (आष्टी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मांजरसुम्भा-पाटोदा-आष्टी-कडा-धानोरा ते अहमदनगर या रस्त्यास राष्ट्रीय महामार्ग म्हणून मंजुरी देण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर रस्त्याच्या कामाची सद्यस्थिती काय आहे,
(३) असल्यास, सदर महामार्गाचे काम किती कालावधीत पूर्ण होणे अपेक्षित आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०३-०१-२०१७) :**(१), (२) व (३) केंद्र शासन रस्ते, वाहतूक आणि राष्ट्रीय महामार्ग मंत्रालयाने सदर रस्त्यास सविस्तर प्रकल्प अहवालाच्या फलनिष्पत्तीनुसारच्या अधीन राहून तत्वत: राष्ट्रीय महामार्ग म्हणून मंजूरी दिली आहे. रस्त्याच्या सुधारणेसाठी सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याचे काम प्रगतीत आहे. त्यानंतर कामाविषयी पुढील कार्यवाही केंद्र शासन रस्ते, वाहतूक आणि राष्ट्रीय महामार्ग मंत्रालय मार्फत हाती घेण्यात येईल.

---

**भिवंडी तालुक्यातील (जि.ठाणे) घोटी व पडघा या दोन टोल नाक्यावर गैरव्यवहार होत असल्याबाबत**

**(४५) ६३४८५ (२४-०८-२०१६). श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडी तालुक्यातील (जि.ठाणे) घोटी व पडघा या दोन टोल नाक्यावर टोलमध्ये गैरव्यवहार होत असल्याची बाब माहे मे, २०१६ मध्ये निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त बाबीची चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने या गैरव्यवहाराला तात्काळ आळा घालण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०३-०१-२०१७) :**(१) हे खरे नाही, असे भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, पुणे यांनी कळविले आहे.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**तुमसर (जि.भंडारा) तालुक्यातील उपअधिक्षक भूमी अभिलेख हे रिक्त असलेले पद भरण्याबाबत**

**(४६) ६३८५४ (१९-०८-२०१६). श्री.चरण वाघमारे (तुमसर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उपअधिक्षक भूमी अभिलेख कार्यालय तुमसर (जि.भंडारा) येथील उप अधिक्षक हे पद मागील अनेक महिन्यापासून रिक्त असल्याने कार्यालयातील तक्रारीचे प्रमाण वाढत असून नागरीकांची होणारी गैरसोय थांबविण्यासाठी उक्त पद भरण्याबाबत स्थानिक लोकप्रतीनिधि यांनी मा.मुख्यमंत्री यांना दिनांक २३ जून, २०१६ रोजी निवेदन दिले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने रिक्त असलेले पद भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१९-१०-२०१६) :**(१) होय,

(२), (३) व (४) उप अधीक्षक भूमि अभिलेख, तुमसर जि.भंडारा हे पद रिक्त असल्यामुळे सदर पदाचा अतिरिक्त कार्यभार उप अधीक्षक भूमि अभिलेख, मोहाडी जिल्हा भंडारा यांचेकडे सोपविणेत आलेला आहे.

उप अधीक्षक भूमि अभिलेख, तुमसर या कार्यालयात माहे डिसेंबर, २०१५ पासून ते जुलै २०१६ अखेर एकूण २७३ मोजणी प्रकरणे प्राप्त झालेली असून त्यापैकी २३९ प्रकरणे निकाली झालेली आहेत. आजमितीस ३४ प्रकरणे मोजणीवर शिल्लक आहेत. रिक्त पदे भरणेकामी कार्यवाही प्रगतीत आहे.

---

**माजलगांव (जि.बीड) येथे स.नं. ३८० मधील गायरान जमिनीच्या २ हेक्टर जागेवर आठवडी बाजारास परवानगी मिळण्याबाबत**

**(४७) ६४००१ (१९-०८-२०१६). श्री.आर. टी. देशमुख (माजलगांव) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माजलगांव (जि.बीड) येथे स.नं. ३८० मधील गायरान जमिनीच्या २ हेक्टर जागेवर आठवडी बाजारास परवानगी मिळावी या मागणीसाठी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक ९ फेब्रुवारी, २०१६ रोजी मा.महसूल मंत्री यांच्याकडे मागणी केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.जिल्हाधिकारी, बीड, उपविभागीय अधिकारी, माजलगांव, तहसिलदार, माजलगांव यांना लेखी पत्राव्दारे व वारंवार निवेदन देवूनही उपरोक्त मागणीकडे दुर्लक्ष केल्या जात आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्या अनुषंगाने लोकप्रतिनिधींच्या मागणीनुसार आठवडी बाजार सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०५-१०-२०१६) :**(१) होय.

(२), (३) व (४) मौजे माजलगांव, ता.माजलगाव जिल्हा बीड येथील आठवडी बाजारासाठी सर्वे नं.३८० मधील प्रस्तावित असलेल्या २ हेक्टर जमीनीचा वाद न्यायप्रविष्ठ आहे. न्यायालयीन वादावर अंतिम निकाल लागेपर्यंत प्रस्तावित जमीन आठवडी बाजारासाठी नगरपरिषद, माजलगांव, जिल्हा बीड यांना हस्तांतरीत करता येत नाही.

(५) विलंबाचा प्रश्न उद्भवत नाही.

---

**चाकण तळेगाव चौकात उड्डाणपूल बांधण्याबाबत व पुणे नाशिक महामार्गाचे सहापदरीकरण करण्याबाबत**

**(४८) ६४४०८ (२४-०८-२०१६). श्री.संजय (बाळा) भेगडे (मावळ) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चाकण-तळेगाव चौकात उड्डाणपूल बांधण्याबाबत व पुणे नाशिक महामार्गाचे सहापदरीकरण करण्याबाबत राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण आणि केंद्रीय परिवहन मंत्रालयातील अधिकाऱ्यांसोबत नवी दिल्ली येथे महत्वपूर्ण बैठक झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, हा प्रकल्प आता केंद्रीय परिवहन मंत्रालयाऐवजी एनएचआय करेल असा निर्णय सरकारने घेतला होता, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, संपूर्ण प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर हा प्रकल्प हस्तांतरीत केल्यामुळे डीपीआर मंजुरी आणि इतर प्रक्रिया एनएचआयच्या नियमानुसार पुन्हा नव्याने करण्यात येईल, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, अनेक वर्ष प्रलंबित असलेला तळेगाव चाकण रस्त्यावरील तळेगाव चौकात उड्डाणपूल बांधण्याबाबत व पुणे नाशिक महामार्गाचे सहापदरीकरण करण्याबाबत शासन स्तरावर कार्यवाही करण्यात येत आहे काय, नसल्यास विलंबनाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२९-१०-२०१६) :**(१), (२), (३) व (४) होय.

दिनांक ११/५/२०१६ रोजी मा.मंत्री (रस्ते, वाहतूक व महामार्ग) यांचे अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत नाशिक फाटा ते खेड हया महामार्गाच्या सहापदरीकरणाचा प्रकल्प भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण (NHAI) यांचे मार्फत राबविण्याचा निर्णय झाला. पूर्वीच्या सल्लागाराने केलेल्या सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) हा अंतिम टप्पयात असल्याने तो विचारात घेऊनच पुढील कार्यवाही भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण (NHAI) मार्फत प्रगतीत आहे. सदरील प्रकल्पात चाकण ते तळेगाव चौकात उड्डाणपुलाच्या बांधकामाचा समावेश आहे, असे भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, पुणे यांनी कळविले आहे.

---

## लातूर जिल्हयातील भिसे वाघोली ते मसला या रस्त्याच्या दुरुस्तीबाबत

**(४९) ६४४८० (२४-०८-२०१६). श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) लातूर जिल्हयातील अत्यंत खराब झालेला भिसे वाघोली ते मसला या जिल्हा वार्षिक योजनेत प्रस्तावित करावयाच्या कामाची देखभाल दुरुस्तीसाठीचे नाहरकत प्रमाणपत्र जिल्हा परिषद बांधकाम विभाग लातूर यांच्याकडून प्राप्त झाले आहे काय,
(२) असल्यास, सदर कामाच्या मंजुरीबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे कोणती व सदर रस्त्याची दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२७-१०-२०१६) :**(१) होय.
(२) व (३) प्रश्नाधीन जिल्हास्तरीय रस्त्याची दुरूस्ती करणेबाबतचा प्रस्ताव जिल्हा वार्षिक योजना अंतर्गत प्रशासकीय मान्यतेकरीता जिल्हा नियोजन समिती,लातूर यांचेकडे सादर करण्यात आला आहे. त्यास मान्यता अद्याप अप्राप्त आहे.

---

**टेंबी (ता.औसा) येथील प्रस्तावित सौर उर्जा प्रकल्पासाठी जमीन संपादनाच्या व मावेजा वाटपाच्या प्रलंबित कार्यवाहीबाबत**

**(५०) ६४४८२ (१६-०८-२०१६). श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लातूर जिल्हयातील टेंबी ता.औसा येथील सौर उर्जा प्रकल्पासाठी जमीनीच्या संपादनाबाबत व संपादित केलेल्या जमिनीचा मावेजा त्वरित वाटप करुन सदर प्रकल्पाचे काम सुरु करण्याबाबत स्थानिक लोकप्रतीनिधी यांनी मा.ऊर्जा मंत्री यांच्याकडे मागणी केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मागणीच्या अनुषंगाने मा.उर्जा मंत्री यांनी दिनांक ३० जून, २०१६ रोजी मंत्रालयात झालेल्या बैठकीत महाजनको यांच्या अधिकाऱ्यांना त्वरित कार्यवाही करण्याचे आदेश दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे.

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२३-०९-२०१६) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) महानिर्मिती कंपनीने टप्पा क्र.१ साठी एकूण १३२ हे. आर. जमिनीपैकी ११७.४९ हे.आर. जमिन संपादित केली आहे व त्यासाठी रु.११.७२ कोटी संबंधित खाजगी जमीन धारकांना अदा केले आहे. उर्वरित जमिनीची संपादन प्रक्रिया सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :** **डॉ. अनंत कळसे**

**मुंबई.** **प्रधान सचिव,**

**महाराष्ट्र विधानसभा.**

---

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.